की, प्रायोगिक रंगभूमीवर काहीतरी समस्या दाखवतात व त्यावरचा तोडगा. मेळ्यामध्ये ऐतिहासिक किंवा पौराणिक कथा असे. सर्व कामे मुलंच करत. मेळ्याचे प्रयोग गावातील चौका–चौकात होत. सेट बिलकुल नसे. जर जंगल दाखवायंच असेल तर छोटीशी झाडाची फांदी सेटवर ठेवत. महाल दाखवावयाचा असेल तर खुर्ची किंवा नक्षीदार खांब. मेळ्याच्या एका अंकानंतर मेळ्याचा मालक प्रेक्षकांमधून पैश्यांसाठी टोपी किंवा झोळी फिरवत असे व लोक एक पैश्यांपासून आठ आण्या पर्यंत पैसे टाकत. क्वचीत एखादा एक रुपया देत असे. एक रुपया म्हणजे फार मोठी रक्कम समजत. एक रुपया देणाऱ्यांचा स्टेजवर सत्कार केला जाई. सर्वांना कमाईतला अर्धा वाटा समसमान करुन वाटला जाई व अर्धा वाटा मालक स्वत:साठी ठेवत असत.

असो, मेळ्याच्या तालमीला मी जावू लागलो. तालीम जवळच असलेल्या वाड्याच्या एका खोलीत चालली होती. तीन ते चार दिवसानंतर आजोबा म्हणाले, "अरे रम्या, तालीम मास्तरांनी तुला काही शिक वले का?" "हो", अभिनय करुन दाखवतो इति मी. थांब तुझ्या आजीला बोलावतो अस म्हणून त्यानी आजीला, माझ्या आईला, आमच्या सर्व नोकरांना बोलावल. इतकच नव्हे तर गल्लीतील लोंकानाही हाका मारुन बोलावलं. जवळ जवळ २०–२५ लोक आले. त्यांत काही बायका होत्या, मुलं होती . म्हणजे माझ्या कलेच्या पहिल्या प्रयोगाला हाउसफुल्ल गर्दी होती. माझे आजोबा आजीला म्हणाले नातवाला मेळ्यात घालू नका म्हणून डोंक खाल्लस आता त्याचा अभिनय बघून टाळ्या वाजवशील व त्याची दृष्टही काढशील. आजीने नुसतीस मान ठसक्यात हलवली. व्यवस्थित असलेला पदर पुन्हा व्यवस्थित केला आणि माझ्याकडे कौतुकाने पाहत हसली.

आजोबांनी मला बोलण्यास सांगितल. मी चारही बाजूला पाहिल. सर्वांच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती. आईने हसत बोल म्हणून खुणावलं व माझ्या अंगात वेगळाच हुरुप संचारला मी तालीम मास्तरांनी सांगितल्याप्रमाणे पोज घेवून बोलण्यास सुरुवात केली. "अरे नीचा, नराधमा तुझ्या जिभेत जेवढा जोर आहे तेवढा तुझ्या हातात नाही. बडबड बंद कर नाहीतर तुझी जीभ एका झटक्यात कापून तुझ्या हातात देईन." आजोबांनी टाळ्या वाजवल्या सर्वांनी टाळ्या वाजवल्या आईने हसून दाद दिली. आजी फार खूश झाली. ती म्हणाली छान बोलतोस. आणखीन काही येत असेल तर करुन